सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दिनांक : २७/०९/२०२२

## मुंबई पोलीस शिपाई व पोलीस शिपाई (चालक) भरती
## वैद्यकीय चाचणीबाबत सुचना

- मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१५-१६, पोलीस शिपाई भरती-२०१७, पोलीस शिपाई भरती-२०१९ व पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९ प्रक्रियेतील अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या परंतु आक्षेपार्ह पूर्व चारीत्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झालेल्या उमेदवारांची नियुक्ती देण्याची कार्यवाही करणेपुर्वी **वैद्यकीय चाचणीस ०६ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ नुसार पुन्हा वैद्यकीय चाचणी घेणे आवश्यक आहे. तसेच मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९ मध्ये प्रतिक्षा यादीतुन अंतिम निवड यादीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी घेणे आवश्यक आहे.** यास्तव सोबतच्या यादीतील उमेदवारांची वैद्यकीय चाचणी दि. ३०/०९/२०२२ रोजी **पोलीस शल्य चिकित्सक, नागपाडा पोलीस रुग्णालय, भायखळा, मुंबई- ४०० ००८** येथे करण्यात येईल. उमेदवारांनी वैद्यकीय चाचणीच्या दिवशी सकाळी ०९:०० वा. न चुकता उपस्थित रहावे. वैद्यकीय चाचणीस गैरहजर राहील्यास कोणतेही अभिवेदन विचारात न घेता निवड रद्द करण्यात येईल.
- वैद्यकीय तपासणी "महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वेळोवेळीच्या आदेशांनुसार करण्यात येईल.
- वैद्यकीय चाचणीत १) दृष्टीदोष, २) तिरळेपणा, ३) रातआंधळेपणा, ४)वर्णांधतेपणा, ५) गुडघ्यास गुडघा लागणे, ६) सपाट तळवे, ७) त्वचारोग, ८) छातीचे रोग, ९) तोतरेपणा या चाचण्यांचा समावेश असुन या चाचण्यांमध्ये दोष आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवुन त्याची निवड रद्द करण्यात येईल.
- उमेदवाराने वैद्यकीय चाचणीच्या दिनांकास व वेळेस न चुकता उपस्थित राहणे आवश्यक आहे. उमेदवार वैद्यकीय चाचणीसाठी अनुपस्थित राहिल्यास कोणतीही सुचना न देता त्याची निवड रद्द करण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असुन त्याबाबत कुठलेही अभिवेतन विचारात घेतले जाणार नाही.
- वैद्यकीय चाचणीस येताना अलीकडील कालावधीतील ०४ पासपोर्ट आकाराचे फोटो व सर्व मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे न चुकता सोबत आणावीत.
- वैद्यकीय चाचणीत तात्पुरते अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस शल्यचिकित्सक यांच्या शिफारशीनुसार सर जे.जे. समूह रुग्णालयातील संबंधित वैद्यकीय मंडळाकडे/विभागाकडे पुढील तपासणीसाठी पाठविण्यात येईल.
- वैद्यकीय चाचणीसाठी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्यासाठी उमेदवारास कोणत्याही प्रवास खर्च दिला जाणार नाही.
- वैद्यकीय चाचणीच्या वेळी कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैर प्रकारांचा अवलंब केल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय उमेदवारास बंधनकारक राहील.
- पोलीस शिपाई भरती प्रक्रिया अंतर्गत वैद्यकिय चाचण्यात अथवा पुढील प्रक्रियेसंदर्भात कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास उमेदवारांनी त्या बाबतची माहिती अँटी करप्शन ब्युरो मुंबई यांना ०२२-२४९५२०५० व हेल्पलाइन नंबर १०६२ या क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी.
- वैद्यकिय चाचण्यात व पुढील प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवार सदर बाब संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या/ वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देऊ शकतील.
- उमेदवारांनी ७२ तासाच्या आतील कोविड-१९ संबंधी ॲन्टीजेन चाचणीचे प्रमाणपत्र (निगेटीव्ह) सोबत आणणे बंधनकारक राहील.
- अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य यांचे क्रमांक: प्रशि/पो.शि. भरती/सन-२०१९/७०२/२०१९/२८७८, दि. २९/१०/२०२१ रोजीच्या पत्रानुसार पोलीस शिपाई चालक पदासाठी एकापेक्षा अनेक घटकात आवेदन अर्ज सादर केलेले उमेदवार भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येतील. याबाबत उमेदवारांचे कोणतेही अभिवेदन विचारात घेतले जाणार नाही.
- पोलीस भरती बाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे उमेदवाराने काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

**( शाम घुगे )**
सदस्य, मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९ समिती,
तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२), मुंबई.

पोलिस आयुक्त मुंबई

| अ. क्र. | नांव व छाती क्र. | छाती क्र. |
|---|---|---|
| | **मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१५-१६** | |
| १ | श्रीमती अश्विनी लक्ष्मण देवकर<br>(श्रीमती अश्विनी अविनाश भोसले) | |
| | **मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१७** | |
| १ | श्री. योगेश सत्यवान पगारे | ३१०३७ |
| | **मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१९** | |
| १ | श्री. उध्दव विष्णु नागरगोजे | २ |
| २ | श्री. अक्षय शिवाजी सावंत | ६६ |
| ३ | श्री. उमेश शिवाजी गवळी | ४१० |
| ४ | श्री. तुषार दत्तात्रय चौधरी | ५६३ |
| ५ | श्री. सोमनाथ दिनकर डाके | १०१४ |
| ६ | श्री. नवनाथ दामोदर घोडके | ११५७ |
| ७ | श्री. शांताराम हरी थाटे | १२२६ |
| ८ | श्री. किशन दुर्गाजी दुधमल | १२६७ |
| ९ | श्रीमती क्षितीजा दादासो गार्डी | २५०७ |
| १० | श्री. कमलेश राजेंद्र रुपनर | ३६४९ |
| ११ | विशाल विठ्ठल महानवर | ३६९२ |
| १२ | श्री. सचिन आकाराम बोडके | ४०५७ |
| १३ | श्री. भाऊसाहेब मारोती महानोर | ४०९६ |
| १४ | श्री. पंडीत मधुकर गिरी | ४१४३ |
| १५ | श्री. प्रितम काकासाहेब व्यवहारे | ४२६१ |
| १६ | श्री. अभिजीत सोपान चव्हाण | ५११५ |
| १७ | श्री. संदेश नामदेव रणपिसे | ५३८९ |
| १८ | श्री. शांताराम घनश्याम पाटील | ५६२७ |
| १९ | श्री. रोशन विनायक सासे | ५८०५ |
| २० | श्री. तुळशीदास शिवराम पवार | ६०६६ |
| २१ | श्री. ज्ञानेश्वर आप्पासाहेब मुखेकर | ८८०१ |
| २२ | श्री. राहुल सुभाष सोनवणे | ८९२३ |
| २३ | श्री. विशाल सिदलिंगआप्पा देवरमनी | ९४७४ |
| २४ | श्रीमती रचना रमेश गटकळ | ८०११ |
| | **मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९** | |
| १ | श्री. भरत गोरख पवार | ७०३ |
| २ | श्री. आशिष बबन पाटील | ६४८ |
| ३ | श्री. प्रेम सुनिल बाविस्कर | २१० |
| ४ | श्री. गणेश मुरलीधर बडे | ४५१ |
| ५ | भैरवनाथ रघुनाथ कुऱ्हाडे | ५९६ |